तात्काळ

जा.क्र. माध्य. ३ ( १३ (नमाशा/मान्यता)
पुवि / २००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.

दिनांक 2 4 JUL 2001

प्रति,

सचिव, रूपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ,
रूपीनगर [तळवडे] ता. हवेली

विषय - सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ १ : शासन पत्र क्रमांक : नमाशा/१००१/२०९/२००१/माशि-१ दि. ४. ४. २००१
२. शि. अ. [माध्य] जि. प. पुणे यांचे पत्र क्र. शिक्षण/माध्य/ई-४/नमाशा/२००१ दि. १८. ५. २००१

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून ..२०००...... पासून विनाअनुदान तत्वावर/ विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) शासनाने विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये

७) माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

वाचा - १) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्रमांक माशातु-२०१२/(१०/१२) / माशि-१ दिनांक १६ ऑगस्ट २०१२.

२) शासन निर्णय क्र.माशातु-२०१०/(४२०/१०) /माशि-१ दिनांक १४/६/२०१०.

३) मा.शिक्षण संचालक माध्य.व उच्च माध्य.शिक्षण संचालनालय पुणे यांचेकडील पत्र क्र.अमाश/ २०१२-१३/अतिरिक्त तुकड्या/१५ क(०६)/ ८०८५ दिनांक २१/८/२०१२.

४) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.शिउसं/माध्य- ३/१३/२२०७५/७१/ अतिरिक्त तुकड्या/पुवि/१२ दिनांक ५/९/२०१२.

५) आपलेकडील सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ चे पटपडताळणी अहवाल तसेच सदर वर्षाचे अतिरिक्त तुकडी मागणी प्रस्ताव.

६) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक १०/०९/२०१२.

पुणे जिल्हा परिषद पुणे.

यशवंतराव चव्हाण भवन

माध्यमिक शिक्षण विभाग

जा.क्र.जिप/माध्य/अतितु/शिबीर/१२

पुणे दिनांक २७ /०९/२०१२.

## विना अनुदान तुकडी मंजुरी आदेश –

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्यांना सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजुरी दिलेली आहे. सदर मंजूर यादीनुसार आपल्या शाळेस खालील अटीस अधीन राहून शहरी व ग्रामीण विभागातील शाळांतील अतिरिक्त तुकड्यांस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.नं | शाळेचे नाव | इयत्तानिहाय तुकड्यांची संख्या | | | | | | एकुण तुकड्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | |
| | | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | |
| | | ------ | ------ | ------ | ------ | १ | ------ | १ |
| १ | राजा शिवछत्रपती विद्यालय, तळवडे ता.हवेली | ------ | ------ | ------ | ------ | २ री | ------ | |

१) इ.५ वी ते ८ वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकड्या सुरु करताना बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) इ.९ वी व १० वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकड्या सुरु करताना शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता कलम ८.३ (एक) नुसार भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३) प्रत्यक्षात निकषानुसार आवश्यक विद्यार्थी पटसंख्या कमी आढळल्यास सदरचे तुकडी मंजूरीचे आदेश आपोआप रद्द होतील.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune - 411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

४) सदरच्या मंजूर केलेल्या तुकड्यांना भविष्यात लागू होणाऱ्या अनुदान सूत्रानुसार किंवा सद्यस्थितीत लागू असलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या वर्षी २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात सदर तुकड्या अनुदानास पात्र होतील. अनुदानास तुकडी पात्र झाली म्हणजे त्या तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित तुकड्यांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र तुकड्यांना अनुदान लागू करेल.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रति,
मुख्याध्यापक संबंधित शाळा राजा शिवछत्रपती विद्यालय, तळवडे ता.हवेली
२/- सदर आदेशानुसार शासन सन २०१२-१३ ची वेतनसंच निश्चिती करण्यात यावी.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u> —

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-०१.

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१

३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-०१.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune-411 062.

Head Master
Raja Shiv Chhatrapati Vidyalaya
Talawade, Tal. Haveli,
Dist. Pune - 411 062.